माहितीचा अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

**कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.**

/ :-०२२,२७५७१३९१. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.computer@mahalfa.in

क्रं.स्था.18/ब/MAINS/लेखापरीक्षण अहवाल/संगणक शाख़ा/न.क्र.94/ २३९८. दिनांक : 12 DEC 2017

प्रति,

सहसंचालक,
स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व).

सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व).

विषय : MAINS प्रणालीवरील अहवालातील त्रुटींबाबत.

संदर्भ : 1. संचालनालयाचा e-mail संदेश दिनांक 03/06/2016.
2. संचालनालयाचा e-mail संदेश दिनांक 02/07/2016.
3. संचालनालयाचे पत्र क्रमांक स्था.18/ब/Mains/संगणक शाखा/कलेप/न.क्र. 75 अ/78/728, दिनांक 27/03/2017.
4. संचालनालयाचा e-mail संदेश दिनांक 09/10/2017.
5. संचालनालयाचे पत्र क्रमांक स्था.18/ब/अहवाल निर्गमन/संगणक शाखा/क.ले.प. /न.क्र. 107/2342, दिनांक 14/11/2017.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 नुसार प्रत्येक शासकीय कर्मचा-याने आपल्या कामामध्ये नितांत सचोटी व कर्तव्यपरायणता ठेवणे आवश्यक आहे. स्थानिक निधी लेखा परीक्षण विभागाचा अहवाळ निर्गमित करताना कार्यालय प्रमुख या नात्याने लेखापरीक्षण अहवाल वाचून तो बिनचूक आहे, याची खात्री करुन सदरचा अहवाल निर्गमित करावयाचा आहे. परंतु लेखा परिक्षण अहवालामध्ये Repetition of Para, Difference in para Heading and Para Content, Para download केल्यानंतर Font मध्ये बदल होणे, इ. त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तरी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन न केल्यामुळे सदर त्रूटी आढळून येत आहेत. लेखापरिक्षण अहवाल हा लेखापरिक्षणाचा अत्यंत महत्वाचा भाग़ आहे. तरी अहवाल निर्गमन या जबाबदार कामामध्ये दुर्लक्ष दिसून येत आहे.

संदर्भ क्रमांक 1 नुसार अहवालासाठी आवश्यक असणा-या attachment scan कराव्यात जेणेकरुन कमी size ची pdf तयार होईल. संदर्भ क्रमांक 2 नुसार आपल्या कार्यालयातून बदली झालेल्या कर्मचा-यासाठीच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. संदर्भ क्रमांक 3 नुसार आणि दिनांक 29/10/2015 चे (MAINS INSTRUCTION AUDITORS USER GUIDE) मध्ये दिलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे. MAINS वरील त्रुटी संगणक शाखेला सादर करत असताना वारंवार Format कळविलेला असताना सदर Format मध्ये त्रुटी सादर करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्रुटींबद्दल अपु-या प्राप्त होणा-या माहितीमुळे त्रुटीचे निराकरण करण्यास विलंब होतो. तरी येथून पुढे संगणक शाखेला त्रुटी कळविताना संदर्भ क्रमांक 4 मध्ये देण्यात आलेल्या Format मध्येच पाठविण्यात याव्यात. अहवालासाठी आवश्यक असणा-या attachment च्या बाबतीत संदर्भ क्रमांक 5 मध्ये देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे. तरी अहवाल निर्गमन करत असताना यापुर्वी देण्यात आलेल्या सुचनांसह खालील सुचनांचे पालन करण्यात यावे.

परिच्छेद टंकलिखीत करताना ,

1. Font Name : Mangal ,

2. Font Size : 11,

3. Margin : Normal,

4. Alignment : Left.

या setting ची निवड करण्यात यावी.

अहवाल निर्गमित करत असताना वरील सर्व बाबी तपासून स्वाक्षरीसह अहवाल निर्गमित करावा. भविष्यात उपरोक्त त्रुटींची पुनरावृत्ती निदर्शनास आल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 नुसार आपणावर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(प्रताप मोहिते),
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.